# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापिठ नागपूर

## मोहपा एज्युकेशन सोसायटी, मोहपा

## बॅरी. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा ता. कळमेश्वर, जि. नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रमाचा अहवाल
## २०२३–२४


**डॉ. प्रमोद आसाराम वडते**
रासेयो कार्यक्रम अधिकारी

**डॉ. मारोती विठ्ठलराव कोल्हे**
प्राचार्य

# आंतरराष्ट्रीय योग दिवस

**21-06-2023**








# आंतरराष्ट्रीय योग दिवस

**बुधवार दि. २१ जुन २०२३**

मोहपा शिक्षण मंडळ मोहपा द्वारा संचालित बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात नववा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' राष्ट्रीय सेवा योजना व शारिरीक शिक्षण विभाग अंतर्गत साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थिती डॉ. प्रमोद वडते, डॉ. अलका थोडगे, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते (ग्रंथपाल) डॉ. लिलाधर खरपुरिये, कार्यालयीन अधिकारी श्री संजय गणोरकर, श्री शुभम वाघ, श्री हरिश अंजनकर, श्री चेतन सुपले, प्रदीप बागडे, श्री अरंविद डहाट, श्रीमती रजनी गणोरकर तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या शारिरीक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अलका थोडगे यांनी विविध आसन प्रत्यक्ष करुन सगळ्याकडून करुन घेतले यामध्ये सर्वप्रथम शारिरिक हालचाली बैठक आसन, उभे आसन यांचा प्रामुख्याने सराव घेण्यात आला. त्यानंतर अनुलोम–विलोम, ओंकार आणि त्राटक यांची माहिती देण्यात आली व करून घेण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी आसनाबद्द्ल चर्चा केली व त्यांनी आसनामुळे निरोगी शरीर कसे राहिल त्याबद्द्ल फायदे सांगितले.

शेवटी डॉ. विनोद भालेराव यांनी मा. अध्यक्षाच्या अनुमतीने सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण









महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ. एम व्ही कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण.

## नामांकन व रासेयो स्वयंसेवक निवडप्रक्रिया
## व वृक्षारोपण कार्यक्रम

**मंगळवार दि. ०८ ऑगस्ट २०२३**

शैक्षणिक सत्र २०२३–२४ च्या मौसमी हवामानाच्या पावसाळी वातावरणत दरवर्षीप्रमाणे ''राष्ट्रीय सेवा योजना'' अंतर्गत महाविद्यालयात ''वृक्षारोपण'' कार्यक्रम आयोजित करण्यात आले. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, डॉ. एम. व्ही. कोल्हे तसेच इतिहास विभाग प्रमुख डॉ. संजय ढवळे, माजी रोसेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपुरिये, मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव, शारिरीक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अलका थोडगे, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, प्रा. शैलेश हातबुदे यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी रासेयो स्वयं सेवकांची नामांकन व स्वयंसेवकांची निवड प्रक्रियेबद्द्ल वर्षभर कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली.

महाविद्यालयात या कार्यक्रमाकरिता रोपट्यांची व्यवस्था दरवर्षीप्रमाणे शासकीय सामाजिक वनीकरण व वनविभाग कळमेश्वर यांच्या तर्फे करण्यात येते. या सत्रात महाविद्यालयात ७०पेक्षा जास्त रोपे लावण्यात आले सध्या वृक्ष मोठ्या प्रमाणात असल्यामुळे महाविद्यालय परिसर वृक्षांनी नटलेले आहे. यांचे श्रेय मोहपा शिक्षण मंडळाचे माजी मा. सचिव स्व. बाबासाहेब लांडे साहेब यांच्या प्रोत्साहनाने तसेच रोसयो स्वंयसेवक व पर्यावरण विषयाचे आजी–माजी विद्यार्थी–विद्यार्थीनी पर्यावरण विभाग प्रमुख डॉ. प्रमोद वडते. शारिरीक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अलका थोडगे व महाविद्यालयाचे शिक्षकेत्तर कर्मचारी श्री प्रदिप बागडे, श्री प्रकाश कोकाडे, श्री अरंविद डहाट व सौ. रजनी गणोरकर यांच्या परिश्रमामुळे पर्यावरणची सरंक्षण केली जाते.

या कार्यक्रमाकरीता ७० रासेयो स्वंयसेवक / सेवकांची उपस्थिती होती. कार्यक्रम संपल्यानंतर स्वयंसेवकांना चहा, नास्ता देण्यात आला. हा कार्यक्रम संपल्यानंतर बी. ए. ची रासेयो स्वयंसेविका कुमारी संमिश्रा डहाट हिने सर्वाचे आभार मानले.

# स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला महाविद्यालयात स्वच्छता मो

12/08/20
























## महाविद्यालयात स्वच्छता मोहिम

**शनिवार दि. १२ ऑगस्ट २०२३**

महाविद्यालयाच्या परिसरात स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वी राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. रासेयो स्वंसमसेवक/सेविका बहुसंख्येने उपस्थिती होती. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद डॉ. अलका थोडगे रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य व इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अजीत जाचक, डॉ. संजय ठवळे, ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते प्रा. सचिन काळे, प्रा. अनित गणोरकर, प्रा. शैलेश हातबुदे, महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपीक श्री. संजय गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले, अरुण डहाट, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे व प्रकाश कोकाडे यांच्या सहकार्याने महाविद्यालयाचे परिसर स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता मोहिमेकरिता ७६ विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. शेवटी स्वच्छता मोहिम संपल्यानंतर स्वयंसेविका कु. साक्षी राउत हिने सर्व स्वयंसेवकांचे आभार मानले. याच संख्येने वर्षभर स्वयंसेवकाने उपस्थिती दाखवावी असे आवाहन केले व महाविद्यालयात स्वच्छता झाल्यावर सर्व स्वयंसेवकांना केळी वाटप करण्यात आली.

# आंतर राष्ट्रीय युवा दिन

शनिवार दिनांक :- १२ ऑगस्ट २०२३









# आंतरराष्ट्रीय युवा दिन

**शनिवार दि. १२ ऑगस्ट २०२३**

आज महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना, बॅरी. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा व रेड रिबन क्लब यांच्या वतीने संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. मा. डॉ. एम. व्ही. कोल्हे, प्रमुख वक्ते माजी रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ. लीलाधर खरपूरीये तसेच इतिहास विभागप्रमुख डॉ. संजय ठवळे व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. प्रमोद वडते यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यामध्ये एच.आय.व्ही. एड्स संबंधात जागृती करणे तसेच या वर्षात विविध कार्यक्रमाचे आयोजनाबद्यल माहिती दिली. प्रमुख वक्ते डॉ. लीलाधर खरपूरीये यांनी युवा कोणत्याही देशाच्या प्रगतीचा कणा आहे. भारतात एकुण लोकसंख्येच्या ६५ टक्के लोकसंख्या युवकांची आहे. याच युवकांच्या भरवश्यावर भारत जगात तिसरा क्रमांकाची महासत्ता म्हणून उदयास आली आहे. म्हणून युवकांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. असे विचार विशद केले.

डॉ. संजय ठवळे यांनी आपल्या भाषणात राज्यकर्त्यांनी युवाशक्तीकडे गंभीरपणे पाहणे आज काळाची गरज आहे. राज्यकर्त्यांनी युवाशक्तीचा उपयोग केला तर भारत महाशक्तीकडे वाटचाल करु शकतो. युवकांनी राज्यकर्त्यांच्या प्रलोभनांना बळी न पडता आपले कौशल्य देणे आजची गरज आहे. जगात शेकडो क्रांती झाल्या, त्या क्रांतीमध्ये युवकांचा फार मोठा वाटा आहे. असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्रा. डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी सारांशपणे टिपणी केली. त्यात युवकांनी सावधपणे पावले उचलून आपली प्रगती करावी. असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन सचिन काळे यांनी केले तर आभार शैलेश हातगुडे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, डॉ. अलका थोडगे, प्रा. अनिता गणोरकर तसेच सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री प्रदीप बगडे, श्री अरुण डहाट, प्रकाश कोकोडे, श्रीमती रजनी गणोरकर यांनी प्रयत्न केले.

# स्वातंत्र्य दिन

**15-08-2023**








# स्वातंत्र्य दिन

**मंगळवार दि. १५ ऑगस्ट २०२३**

शैक्षणिक सत्र २०२३–२४च्या, स्वातंत्र्य दिनानिमित्य महाविद्यालयातील ध्वजारोहण मोहपा शिक्षण मंडळाचे मा. सचिव श्री अरविंद धवड यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मोहपा शिक्षण मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री तेजरामजी नाखले, रेखडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री. वामनरावजी देवते, न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी. प्रा. ढोरे व महाविद्यालयाचे मा. प्रा. डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला.

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते तसेच इंग्रजी विभाग प्रमुख व रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक, वरिष्ठ प्रा. संजय ढवळे, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, विद्यार्थी विकास कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपूरीये शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. संजय गणोरकर, शुभम वाघ, श्री. चेतन सुपले, श्री. अजय अंजनकर, प्रदीप बागडे, अरविंद डाहात, रजनी गणोरकर, प्रकाश कोकोडे उपस्थित होते. विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या आवाजात राष्ट्रगीत सादर करुन झेंड्याला सलामी दिली. शेवटी विद्यार्थ्यांमध्ये बिस्किट वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

# सद्भावना दिन

**20-08-2023**












## सद्भावना दिन

**रविवार दि. २० ऑगस्ट २०२३**

महाविद्यालयात 'राष्ट्रीय सेवा योजना' अंतर्गत सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहपा शिक्षण मंडळ मोहपाचे सदस्य मा. तेजरामजी नाखले प्रमुख वक्ते प्रा. नरसिंग राठोड, इंदिरा गांधी महाविद्यालय कळमेश्वर, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री चेतन सुपले यांच्या उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. नरसिंग राठोड यांनी देशाच्या युवा वर्गाची भावनिक ऐक्य सामज्यस्याची तरुणांवर जबाबदारी महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन केले. तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्री. तेजराम नाखले यांनी माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या कार्याचा आलेख मोठ्या स्वरुपाचे असून माहिती व तंत्रज्ञान फार मोठे योगदान असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी थोर पुरुषांची जयंती–पुण्यतिथी करणे काळाची गरज आहे त्यामधून विद्यार्थ्यांना इतिहासाची पुनरावृत्ती होते. असे नमुद केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा. सचिन काळे व आभार प्रदर्शन रासेयो विद्यार्थ्यांनी प्रतिनिधी अनिशा सरोदे हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रकाश कोकडे व सौ. वैशाली हाडोळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम संपल्यानंतर रासेयो विद्यार्थ्यांनी श्रमदान केले व शेवटी रासेयो विद्यार्थ्यांना चहा व नास्ता देण्यात आला.

# कर्करोग जनजागृती कार्यशाळा







**मोहपा शिक्षण मंडळाची सचिव मा. श्री अरविंद धवड साहेब प्रास्ताविक भाषण करताना.**







**डॉ. माधुरी गावंडे "कर्करोग जनजागृती कार्यशाळा"व्याख्यान करताना**






# कर्करोग जनजागृती कार्यशाळा

**गुरुवार दि. २४ ऑगस्ट २०२३**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल ॲन्ड रिसर्च सेंटर नागपूर व मोहपा शिक्षण मंडळ मोहपा संचालित बॅरि.शेषराव वानखेडे महाविद्यालय व न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय मोहपा यांच्या संयुक्त विद्यमाने " राष्ट्रीय सेवा योजना व रेड रेबिन क्लब"च्या अंतर्गत कर्करोग जनजागृती कार्यशाळा न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित करण्यात आली.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक स्त्रि रोगतज्ञ डॉ. माधुरी गावंडे, (रतुम हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर नागपूर) यांनी कर्करोगाचे विविध प्रकार, कर्करोग होण्याची कारणे व कर्करोग होऊ नये यासाठी उपाययोजना कसे करावे. विशेषत: स्त्रियांना होणाऱ्या कर्करोगाचे निदान या संदर्भात सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहपा शिक्षण मंडळाचे मा. सचिव श्री अरविंद धवड व डॉ. विशाल कडू तसेच प्रमोद रामेकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, शारिरीक शिक्षण संचालक डॉ. अलका थोडगे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते व अरविंद डहाट तसेच न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे मा. प्राचार्य प्रकाश आदमने व समसुद्दीन शेख, श्री प्रा. देशमुख, प्रा. निवेदिता मानमोडे, डॉ. मुरली चिमोटे, उदय अंजनकर, सौ. रंजना वडते, सौ. वंदना चर्जन व सौ. माधुरी पवार तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मदत केली.

# राष्ट्रीय क्रिडा दिन

**9-9-2023**















## राष्ट्रीय क्रिडा दिवस

**शनिवार दि. ०९ सप्टेंबर २०२३**

महाविद्यालयात 'राष्ट्रीय क्रिडा दिवस' राष्ट्रीय सेवा योजना व शारिरीक शिक्षण विभाग अंतर्गत साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एम. व्ही. कोल्हे व प्रमुख पाहुणे श्री बिझांणी महाविद्यालयाचे शारिरीक निर्देशक डॉ. संजय चौधरी (सिनेट सदस्य, रातुम नागपूर विद्यापीठ) प्रमुख वक्ते उमाठे महाविद्यालयाचे प्रा. अपूर्व पाल व जे. एम. पटेल महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण निर्देशक डॉ. बी. एस. पवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रमुख वक्ते प्रा. पाल यांनी ॲक्लेटिक्स या विषयावर पीपीटी द्वारे मागदर्शन व त्यांचे महत्त्व समजावून सांगितले. प्रमुख पाहुणे डॉ. संजय चौधरी यांनी विद्यार्थ्यांना क्रिंडागणाबाबत त्याचे महत्व व फायदे याबद्‌दल सविस्तर विवेचन केले. डॉ. बि. एस. पवार यांनी खेळांच्या बाबतीत सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाला महाविद्यालयाचे वरिष्ठ प्रा. डॉ. संजय ढवळे, रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, श्री संजय गणोरकर व सर्व कर्मचारी उपस्थित होते. डॉ. विनोद भालेराव यांनी संचालन केले. तर प्रास्ताविक व पाहुण्याचा परिचय महाविद्यालयाच्या क्रिडा संचालक डॉ. अलका थोडगे यांनी केला. डॉ. लिलाधर खरपुरीये यांनी सर्व पाहुण्याचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम वाघ, श्री हरिश अंजनकर, चेतन सुपले, प्रदीप बागडे, रजनी गणोरकर, अरविंद डहाट व प्रकाश कोकोडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# कर्करोग निदान शिबीर

**दिनांक :12 व 13 सप्टेंबर 2023**




**मा. श्री.अरविंद धवड (सचिव ,मोहपा शिक्षण मंडळ मोहपा)**
**अध्यक्षीय भाषण करताना.**










**प्रा. विनोद भालेराव** **डॉ. वैष्णवी बाभरे** **डॉ. सोनल प्रभू**






## महाविद्यालयात कर्करोग निदान शिबिर

**मंगळवार : १२ सप्टेंबर २०२३**

महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक व नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटरच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात नि:शुल्क कर्करोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी कळमेश्वर येथिल ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने एच.आय.व्ही. तपासणी देखील करण्यात आली.

मोहपा एज्युकेशन सोसायटीचे सचिव मा. अरविंद धवड यांच्या अध्यक्षस्थानी उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. एम. व्ही. कोल्हे, न्यु. इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश आदमने यांचेसह कॅन्सर हॉस्पीटलच्या डॉ. वैष्णवी बामरे, डॉ. सोयल प्रभू, सरिता लिहितकर, संजय आंबले, रवि शाहू, सविता धाबे, विकास थुलकर तसेच कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयाच्या समुपदेशक अर्चना चंदनखेडे आणि मनोज धावडे, कविदास येसकर प्रामुख्याने उपस्थित होते.

मोहपा परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसह १८४ महिला पुरुषांनी तपासणी करवून घेतली.

शिबिराच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते, डॉ. अलका थोडगे, डॉ. संजय ढवळे, डॉ. अजित जाचक, डॉ. धंनजय देवते, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. अनिता गणोरकर, महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपीक श्री. संजय गणोरकर, श्री. अजय अंजनकर, शुभम वाघ, सौ. रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश बोवाडे तसेच न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे सहाय्यक शिक्षक श्री. भूपेश मारोडे, डॉ. निवेदिता राऊत, विवेक देशमुख व महाविद्यालयाचे रासेयो पथकांनी सहकार्य केले.

शिबिराचे संचालन डॉ. विनोद भालेराव तर आभार प्रदर्शन डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले. शेवटी कार्यक्रमामध्ये सहभागी पाहुण्यांना व रासेयो स्वंयमसेवकांना चहा व नास्ता देण्यात आला.

# "स्वच्छता ही सेवा" हे विशेष अभियान

## महाविद्यालय परिसर स्वच्छता
















# ‘स्वच्छता ही सेवा’ हे विशेष अभियान

## महाविद्यालय परिसर स्वच्छता

गुरुवार दि. २१ सप्टेंबर २०२३

उपरोक्त विषयानुसार केंद्र शासनाच्या युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालयाच्यावतीने देशभरात दि. १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२३ या कालावधीमध्ये ‘‘स्वच्छता ही सेवा’’ हे विशेष अभियान आपल्या विद्यापीठ व महाविद्यालयातंर्गत राष्ट्रीय येवा योजनेच्या माध्यमातून राबविण्यात आला. यामध्ये महाविद्यालय परिसर, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता (बस स्टॅन्ड) तसेच दत्तक गावात ‘‘ग्राम स्वच्छता व दत्तक गावात रॅली, पथनाट्य इ. चे. आयोजन करण्यात आले.

या दिवशी महाविद्यालयाचे परिसर स्वच्छ करण्यात आले. या मोहिमेमध्ये महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अजित जाचक, प्रा. डॉ. विनोद भालेराव, प्रा. डॉ. संजय ढवळे, डॉ. लिलाधर खरपुरिये, व ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. अनिता गणोरकर व रासेयो कार्यक्रम अधिकारी, प्रा. प्रमोद वडते व विद्यार्थी व विद्यार्थीनी बहुसंख्येने सहभागी होते.

# "राष्ट्रीय सेवा योजना दिन "

**24-09-2023**




















# राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन

रविवार दि. २४ सप्टेंबर २०२३

बॅरि.शेषराव वानखेडे जयंती व राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिना निमित्य महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे तर प्रमुख उपस्थिती महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संजय ढवळे, सिनेट सदस्य व इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अजीत जाचक व वरिष्ठ लिपीक श्री संजय गणोरकर यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

अध्यक्षीय भाषणात डॉ. एम. व्ही. कोल्हे यांनी वानखेडे साहेबांच्या व्यक्तीमत्त्वावर प्रकाश टाकला व साहेबांनी ज्या–ज्या क्षेत्रात काम केले त्या क्षेत्राचे त्यांनी सोनंच केले. त्यानंतर त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्थापनेचा इतिहास सांगितला.

प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी राष्ट्रीय सेवा योजना वर्षेभराचा कार्यक्रम कसा असतो त्याबद्द्ल स्वयंसेवकांना माहिती उद्बोधन केले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी केले. डॉ. धनंजय देवते, डॉ. लिलाधर खरपुरिये, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. चनकापुरे, श्री हरिश अजनकर, श्री शुभम वाघ, श्री चेतन सुपले व बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता श्री अरविंद डहाट, श्रीमती रजनी गणोरकर, श्री प्रदीप बगडे व श्री प्रकाश कोकोडे यांनी प्रयत्न केले.

# "स्वच्छता ही सेवा" हे विशेष अभियान

## मोहपा बस स्थानक परिसर स्वच्छता

25-09-2023

















## ''स्वच्छता ही सेवा '' हे विशेष अभियान

## 'सार्वजनिक स्थळे स्वच्छता'

**सोमवार दि. २५ सप्टेंबर २०२३**

१५ सप्टेबर ते २ ऑक्टोबर २०२३ या दरम्यान ''स्वच्छता ही सेवा'' हे विशेष अभियान विविध उपक्रमाचे आयोजन 'राष्ट्रीय सेवा योजना' बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाच्या अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिम मोहपा बस स्टॅन्ड येथे वरील उपक्रम राबविण्यात आले.

मोहपा बस स्टॅन्डच्या संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आले तसेच बस स्टॅन्डच्या परिसरात असलेली पाण्याची टाकी व नाले व्यवस्थित साफसफाई करण्यात आले. व बस स्टॅन्डवर रासेयो स्वंयसेवकांनी पथनाट्य स्वरुपात जनजागृती व प्रत्येक प्रवाशांना कचरा व पाणी प्रदुषणाबाबत जनजागृती करण्यात आले.

जनजागृतीच्या कार्यक्रमात ७० पेक्षा जास्त स्वंयसेवकांनी सहभाग नोंदविला. असेच सार्वजनिक काम नेहमी नेहमी व्हावे जेणेकरुन देशाची सेवा होईल असे मत महाविद्यालयाची रासेयो स्वयंमसेविका बी.ए. भाग–२ची विद्यार्थीनी कु.समिश्रा डहाट हीने व्यक्त केले.

या कार्यक्रमाला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते, डॉ. विनोद भालेराव, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. चनकापुरे व प्रा. अनिता गणोरकर ह्यांच्या सहकार्यामुळे हे विशेष अभियान राबविण्यात आले.

# मेरी माटी मेरा देश

**06-10-2023**

















सावन कैलास उके यांची “मेरी माटी मेरा देश” या अभियान अंतर्गत दिल्ली येथे निवड.

# मेरी माटी मेरा देश

शुक्रवार ९ ऑक्टोबर २०२३

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत 'मेरी माटी मेरा देश' हा राष्ट्रीय महोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रमोद आसाराम वडते म्हणाले की, 'मेरी माटी मेरा देश' हा उत्सव म्हणजे देशाची एकता अखंडित कायमस्वरुपी टिकून राहावी म्हणून अशा उत्सवाचे देश पातळीवरील सातत्याने आयोजन होणे काळाची गरज आहे.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे हे सुद्धा आपल्या अध्यक्ष भाषणातून 'मेरी माटी मेरा देश' हा सामाजिक उपक्रम म्हणजे तळागाळातील सामान्या पासून असामान्यांना एकतेचे महत्त्व पटवून देणार आहे असे ते आपल्या अध्यक्षीय भाषणतून बोलत होते. कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असणारे डॉ अजित जाचक, सिनेट सदस्य रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर डॉ. संजय ठवळे, डॉ. लीलाधर खरपूरिये, डॉ. अलका थोडगे, डॉ. धनंजय देवते, प्रा. सचिन काळे, प्राध्यापिका अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापूरे, प्रा. शैलेश हातबूडे, श्री. संजय गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

'मेरी माटी मेरा देश' या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होण्याकरता सावन उके बी. ए. भाग २ चा विद्यार्थी दिनांक १ नोव्हेंबर २०२३ ला महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून दिल्ली येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी झाला होता. या उत्सवा अंतर्गत महाविद्यालयीन कार्यक्रमात ९० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. विद्यार्थ्यांनी कुंडीत माती घेऊन हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला व याच कार्यक्रमाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# "स्वच्छता ही सेवा" हे विशेष अभियान

## दत्तक गाव: मोहगाव परिसर स्वच्छता

27-09-2023















## "स्वच्छता ही सेवा " हे विशेष अभियान

## दत्तक गाव : रॅली व स्वच्छता जनजागृती मोहिम

बुधवार दि. २७ सप्टेंबर २०२३

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत निवडलेले मोहगाव व म्हसेपठार या दत्तक गावापैकी मोहगांव या गावात रॅली व स्वच्छता जनजागृती मोहिम राबविण्यात आले. प्रथमत: या गावात रासेयो स्वंयमसेवकांनी रॅली काढून स्वच्छतेच्या बाबतीत घोषणाच्या माध्यमाद्वारे लोकांपर्यत जनजागृती निर्माण केली.

या रॅलीत रासेयो ६२ स्वयंसेवक व माजी सरपंच श्री विजय ठाकरे, पोलीस पाटील श्री ओमप्रकाश मोहोड, ग्रामपंचायत सदस्य श्री प्रशांत मडावी व मोहपा शिक्षण मंडळाचे मा.सदस्य श्री तेजरामजी नाखले यांनी सुद्धा रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

रॅली स्वच्छता जनजागृती केल्यानंतर रासेयो स्वयंमसेवकांनी गावात व ग्रामपंचायतच्या परिसराने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत ग्रामपंचायतचे ग्रामसेवक (सचिव) सौ. प्रणिता मोतीराम गणोरकर (गहुकर), श्री राहूल अंजनकर यांनी सुद्धा या अभियानात सहभाग घेतला.

या जनजागृती मोहिम यशस्वीतेकरिता डॉ. अलका थोडगे, डॉ. विनोद भालेराव, डॉ. लिलाधर खरपुरिये, प्रा. सचिन काळे, प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. चनकापुरे, प्रा. अनिता गणोरकर व रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांच्या सहकार्यामुळे ही जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले.

# राष्ट्रीय एकता दिन व कर्करोग लसीकरण शिबीर

31-10-2023










# राष्ट्रीय एकता दिन
## महाविद्यालयात कर्करोग लसीकरण शिबिर

**मंगळवार : ३१ ऑक्टोबर २०२३**

राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयात नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल अॅन्ड रिसर्च सेंटर आणि रोटरी क्लब निशांत यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीवा कर्करोग प्रतिबंधात्मक लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मोहपा एज्युकेशन सोसायटीचे मा. सचिव श्री. अरविंद धवड यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटलच्या डॉ. माधुरी गांवडे व प्रमुख अतिथी डॉ. विशाल कडू तसेच लसीकरण शिबिराचे अर्थसाहाय्य करणारे गरजवंतांचे देवदूत, रोटरी क्लब निशांतचे मा. संचालक श्री सचिन अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत ५० विद्यार्थीनीचे नि:शुल्क लसीकरण करण्यात आले.

रोटरी क्लब निशांतचे मा. संचालक श्री. सचिन अग्रवाल हे गेल्या १२ वर्षापासून गरजवंतांची अविरत सेवा करित आहे. प्रत्येकांनी आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जनतेची सेवा करून सामाजिक आरोग्य राखण्यासाठी सहकार्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले तसेच त्यांनी ग्रीवा कर्करोग प्रतिबंधक लस टोचल्यास या रोगापासून ७५% महिला सुरक्षित राहू शकतात.

या प्रसंगी व्यासपीठावर आनंद राठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे मा. प्राचार्य श्री. प्रकाश आदमने प्रामुख्याने उपस्थित होते.

शिबिराच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. संजय ढवळे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद आसाराम वडते, महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. धनंजय देवते, डॉ. अलका थोडगे, प्रा. सचिन काळे प्रा. शैलेश हातबुडे, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे प्रा. अनिता गणोरकर, श्री. संजय गणोरकर, श्री. शुभम वाघ, श्री. चेतन सुपले, श्री. प्रदिप बगडे, श्री. अरविंद डहाट, श्री. प्रकाश आदमने, सौ. रजनी गणोरकर आदिनी सहकार्य केले.

शिबिराचे संचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. लिलाधर खरपुरिये यांनी केले कार्यक्रमाच्या शेवटी लसीकरण विद्यार्थीनींना फळ वाटप करण्यात आले.

# संविधान दिन

**रविवार २६ नोव्हेंबर २०२३**

महाविद्यालयात संविधान दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाची सुरूवात झाली. भारताच्या संविधानाची स्वंयसेवकांना माहिती मिळावी, संविधानाचा उद्देश पत्रिकेचे वाचन करून घेतल्यानंतर या उद्देश पत्रिकेतील मुलभूत तत्वांचा अर्थ समजून घेण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे व प्राध्यापकवृदं व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यावेळी संविधानाचे वाचन केले. या कार्यक्रमाला बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडाते यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रम संपल्यानंतर रासेयो स्वयंसेवकांनी संविधान दिनाचे औचित्य साधून श्रमदान करण्यात आले.

# प्रजासत्ताक दिन

26-01-2024









## प्रजासत्ताक दिन

**शुक्रवार दि. २६ जानेवारी २०२४**

प्रजासत्ताक दिनानिमित्य महाविद्यालयातील ध्वजारोहण मोहपा शिक्षण मंडळाचे मा. सचिव श्री अरंविद धवड यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच मोहपा शिक्षण मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री तेजरामजी नाखले, रेखडे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री वामनरावजी देवते, न्यु इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी. प्रा. ढोरे व महाविद्यालयाचे मा. प्रा. डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला.

रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते तसेच इंग्रजी विभाग प्रमुख व रातुम नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. अजित जाचक, वरिष्ठ प्रा. संजय ढवळे, डॉ. विनोद भालेराव, डॉ. धनंजय देवते, विद्यार्थी विकास कार्यक्रम अधिकारी डॉ. लिलाधर खरपूरीये शिक्षकेत्तर कर्मचारी श्री. संजय गणोरकर, शुभम वाघ, श्री. चेतन सुपले, श्री. अजय अंजनकर, अरविंद डाहात, रजनी गणोरकर, प्रकाश कोकोडे उपस्थित होते. विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या आवाजात राष्ट्रगीत सादर करुन झेंड्याला सलामी दिली. शेवटी विद्यार्थ्यांना पेढे वाटप करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

# शहिद दिन

**30-01-2024**












## शहीद दिन

**मंगळवार : ३० जानेवारी २०२४**

महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत शहीद दिन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या गीताने करण्यात आली? ''या भारतात बंधुभाव नित्य वसु दे दे वरची असा दे'' आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, मोहपा शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा आदरणीय कुंदाताई विजयकर, तर प्रमुख अतिथी म्हणून मोहपा शिक्षण मंडळाचे सन्माननीय सचिव माननीय अरविंदजी धवड साहेब, व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित असणारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे. या सर्व मान्यवरांचे स्वागत रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांनी केले व या कार्यक्रमाची भूमिका विशद करताना राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी या विचारसरणीतून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी अशाप्रकारे त्यांनी आपली भूमिका विशद केली.

प्रमुख अतिथी म्हणून माननीय अरविंदजी धवड साहेब म्हणाले ''राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या यशस्वी जीवनाची सूत्रे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडून दाखविले व त्यांच्या जीवन प्रवासातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी'' आदरणीय कुंदाताई विजयकर आपल्या अध्यक्षीय भाषणातून म्हणाल्या की, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जीवन म्हणजे एक चालते बोलते ग्रंथालय होते असे समृद्ध जीवन महात्मा गांधी आयुष्यभर जगले. अशाप्रकारे अध्यक्षीय भाषणात बोलत होत्या. कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

*कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद भालेराव यांनी तर आभार डॉ.* खरपुरिये यांनी मानले व विद्यार्थ्यांना अल्पोहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# आंतरराष्ट्रीय महिला दिन

**11-03-2024**











# आंतरराष्ट्रीय महिला दिन

**सोमवार : ११ मार्च २०२४**

महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची पुण्यतीथीचे औचित्य साधून आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. एम.व्ही. कोल्हे असून प्रमुख अतिथी म्हणून इतिहास विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. संजय ढवळे यांनी जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कर्तृत्वावर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला व त्यातून विशेषत: मुलींनी सावित्रीबाईच्या जीवन प्रवासातून प्रेरणा घ्यावी. असे आवाहन केले.

डॉ. लीलाधर खरपूरीये यांनी जागतिक महिला दिन म्हणजे स्त्रियांच्या कर्तृत्वाचा दिवस त्यांची उंची मोजता येत नाही एवढी स्त्रियांनी आकाश भरारी घेतली आहे. असे विविध उदाहरणे देऊन कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विनोद यु. भालेराव. यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सचिन काळे तर आभार प्रा. शैलेश हातबुडे यांनी मानले व्यासपीठावर प्रामुख्याने उपस्थित असलेले रा. से. यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते व विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जागतिक जल दिन

**22-03-20224**
















## जागतिक जल दिन

**शुक्रवार : २२ मार्च २०२४**

जागतिक जल दिनानिमित्त महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २२ मार्च २०२४ ला कार्यक्रमाचे आयोजन रा.से.यो. विभाग आणि ग्रीन क्लब विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाने करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे तर प्रमुख अतिथी म्हणून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त श्री. प्रदीप विघ्ने होते. पाणी हेच जीवन आहे. अशा विधानाने सुरुवात कार्यक्रमाची सुरुवात करुन मानवी आयुष्यात पाणी किती महत्त्वाचे आहे, पाण्याशिवाय माणूस जगूच शकणार नाही. त्यामुळे भविष्यात येणाऱ्या अडचणींचा सामना कशा प्रकारचा करायचा त्यासाठी पाण्याची बचत करा अशा प्रकारचा आशय घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना, पाण्याशिवाय माणूस जगू शकत नाही. एक वेळा माणसाला जेवण मिळाले नाही तरी चालेल पण पाण्याशिवाय तो राहू शकत नाही. असे विविध उदाहरण देऊन पाण्याचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषद करताना डॉ. प्रमोद आसाराम वडते यांनी, भविष्यामध्ये पाण्यासाठी युद्ध होऊ नये म्हणून आपण पाण्याची बचत केली पाहिजे. ही चळवळ एका दिवसाची नसून निरंतर चालणारी प्रक्रिया आहेत. असे डॉ. वडते आपल्या प्रास्ताविकातून बोलत होते. याप्रसंगी २०२४ च्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे मानकरी प्रदीप विघ्ने यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सत्कार अध्यक्षाच्या वतीने करण्यात आला.

व्यासपीठावर विराजमान झालेल्या शारीरिक शिक्षक विभागाच्या प्रमुख डॉ. अलका थोडगे यांनाही २०२४ चा ''राजमाता जिजाऊ'' हा पुरस्कार प्राप्त झाल्यामुळे त्यांचाही शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी संख्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद भालेराव तर आभार प्रा. सचिन काळे यांनी मानले व कार्यक्रमाची सांगता विद्यार्थ्यांना बिस्किट देऊन करण्यात आली.

N. S. S. Programme Officer
Br. Wankhede Mahavidyalaya
MOHPA.

Principal
Bar.Sheshrao Wankhede
Mahavidyalaya,Mohpa

—: सद्भावना दिवस :—

नागपूर, 21 ऑगस्ट 2023 | नवराष्ट्र

# भावनिक ऐक्य सामज्यस्याची तरुणांवर जबाबदारी

## प्रा.नरसिंग राठोड : वानखेडे महाविद्यालयात सद्भावनादिन



मोहपा, वार्ताहर. सद्भाव दिनानिमित्त बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय येथे 'राष्ट्रीय सेवा योजना' अंतर्गत सद्भाभावना दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मोहपा शिक्षण मंडळ मोहपाचे सदस्य तेजराम नाखले प्रमुख वक्ते प्राध्यापक नरसिंग राठोड, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांच्या उपस्थितीत पार पडला. देशाच्या युवा वर्गाची जबाबदारी दिवसेंदिवस गणितीय पद्धतीने वाढत असून भारतीय जनतेचे भावनिक एक्य सामज्यस्यासाठी काम करणे ही युवा वर्गाची महत्वपूर्ण जबाबदारी असल्याचे प्रा. राठोड यांनी प्रतिपादन केले. माजी पंतप्रधान दिवंगत राजीव गांधी यांच्या कार्याचा आलेख फार मोठा असून माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात फार मोठे योगदान असल्याचे मत नाखले यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रमोद वडते यांनी थोर पुरुषांची जयंती पुण्यतिथी साजरा करण्याचे फायदे नमूद केले. तर कार्यक्रमाचे संचलन प्रा. सचिन काळे व आभार प्रदर्शन रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी अनिशा सरोदे हिने केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चेतन सुपले, प्रकाश कोकडेव, वैशाली हाडोळे यांनी परिश्रम घेतले.

क्रीडा दिवस

नवराष्ट्र | नागपूर, 12 सप्टेंबर 2023

# वानखेडे महाविद्यालयात कबड्डीचे सराव शिबिर



मोहपा, वार्ताहर. स्थानिक मोहपा शिक्षण मंडळ द्वारा संचालित बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालयात शनिवारी क्रीडा दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या मैदानावर सर्वप्रथम जे. एम.पटेल महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. बी.एस.पवार यांनी महाविद्यालयाच्या पुरुष आणि महिला कबड्डी संघाचे सराव शिबिर घेतले. त्यानंतर महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एम. व्ही.कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एम.के.उमाठे महाविद्यालयाचे प्राध्यापक अपूर्व पाल यांनी ॲथ्लेटिक्स या विषयावर पीपीटीद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री बिझाणी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ.संजय चौधरी यांचा रातुम नागपूर विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीमध्ये सिनेट सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सर्वांना क्रीडा शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.संजय ढवळे, डॉ.प्रमोद वडते, डॉ.अजित जाचक,डॉ.धनंजय देवते, गणोरकर,कार्यालयीन अधिकारी संजय गणोरकर व सर्व कर्मचारी उपस्थित होते. डॉ.विनोद भालेराव यांनी संचालन केले तर प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयाच्या क्रीडा संचालक डॉ. अलका थोडगे यांनी केला. डॉ. लीलाधर खरंपुरे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शुभम वाघ, चेतन सुपले, हरीश अंजनकर,अरविंद डहाट, प्रदीप बगडे, रजनी गणोरकर, प्रकाश कोकडे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

लोकमत
नागपूर, बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०२३

# वानखेडे महाविद्यालयात क्रीडा दिवस



**कळमेश्वर :** मोहपा येथील बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या मैदानावर जे. एम. पटेल महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण निर्देशक डॉ. बी. एस. पवार यांनी पुरुष व महिला कबड्डी संघाचे सराव शिबिर घेतले. त्यानंतर सेमिनार हॉलमध्ये प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एम. के. उमाठे, प्रा. अपूर्व पाल यांनी ॲथलेटिक्स या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी श्री बिझाणी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षक निर्देशक डॉ. संजय चौधरी यांचा रातुम नागपूर विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत सिनेट सदस्य म्हणून निवडून आल्याबद्दल सत्कार करण्यात आला. उपस्थितांना क्रीडा शपथ देण्यात आली. कार्यक्रमाला प्रा. डॉ. संजय ढवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, गणोरकर, कार्यालयीन अधिकारी संजय गणोरकर व कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. अलका थोडगे यांनी केले. संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी केले. आभार डॉ. लीलाधर खरपुरे यांनी मानले. शुभम वाघ, चेतन सुपले, हरीश अंजनकर, अरविंद डहाट, प्रदीप बगडे, रजनी गणोरकर, प्रकाश कोकडे आदींनी सहकार्य केले.

9/09/2023
शनिवार

-: कर्करोग निदान शिबिर :-

नवराष्ट्र | नागपूर, 14 सप्टेंबर 2023

# वानखेडे महाविद्यालयात कर्करोग निदान शिबिर




मोहपा, वार्ताहर. बॅरि. शेषराव वानखेडे जयंती आणि राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना पथक आणि नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल अ‍ॅन्ड रिसर्च सेंटरच्या संयुक्त विद्यमाने मोहपा येथील बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात निःशुल्क कर्करोग निदान शिबिर आयोजित करण्यात आले. यावेळी कळमेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने उपस्थितांची एचआयव्ही तपासणी देखील करण्यात आली. मोहपा एज्युकेशन सोसायटीचे सचिव अरविंद धवड यांच्या अध्यक्षस्थानी उद्घाटन कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारोती कोल्हे, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश आदमने यांचेसह कॅन्सर हॉस्पिटलच्या डॉ.वैष्णवी बाभरे,डॉ. सोनल प्रभू, सारीत लिहितकर, संजय आंबले, रवी शाहू, सविता धाबे, विकास थूलकर तसेच कळमेश्वर ग्रामीण रुग्णालयाच्या समुपदेशक अर्चना चंदनखेडे आणि मनोज धावडे, कविदास येसकर प्रामुख्याने उपस्थित होते. संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. लीलाधर खरपुरिये यांनी केले. मोहपा परिसरातील नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. शाळा महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह 184 महिला व पुरुषांनी तपासणी करवून घेतली. शिबिराच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद वडते, डॉ. अलका थोडगे, डॉ. संजय ठवळे, डॉ. अजित जाचक, डॉ. धनंजय देवते, सिद्धार्थ चनकापुरे, अनिता गणोरकर, संजय गणोरकर, अजय अंजनकर, शुभम वाघ, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे,अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे तसेच न्यू इंग्लिश हायस्कूलचे सहायक शिक्षक भूपेश मारोडे, डॉ. निवेदिता राऊत, विवेक देशमुख आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

-: कर्करोग लसीकरण शिबीर :-

नागपूर, 2 नोव्हेंबर 2023 | नवराष्ट्र

# मोहपा येथे निःशुल्क कर्करोग लसीकरण शिबीर




मोहपा, वार्ताहर. येथील बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालयात नागपूरचे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल आणि रोटरी क्लब निशांत यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रीवा कर्करोग प्रतिबंधात्मक लसीकरण शिबीराचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

मोहपा एज्युकेशन सोसायटीचे सचिव अरविंद धवड यांचे हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटलच्या डॉ. माधुरी गावंडे, डॉ. विशाल कडू प्रमुख अतिथी होते. लसीकरण शिबिरास अर्थसाहाय्य करणारे गरजवंतांचे देवदूत, रोटरी क्लब निशांतचे संचालक सचिन अग्रवाल गेल्या 12 वर्षापासून गरजवंतांची अविरत सेवा करीत आहे. प्रत्येकाने आपल्या आर्थिक क्षमतेनुसार जनतेची सेवा करून सामाजिक आरोग्य राखण्यासाठी सहकार्य केले पाहिजे, असे मत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. ग्रीवा कर्करोग प्रतिबंधक लस टोचून घेतल्यास या रोगापासून 75 टक्के महिला सुरक्षित राहू शकतात, असेही ते पुढे म्हणाले. शिबिरात 50 विद्यार्थिनींचे निशुल्क लसीकरण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर आनंद राठी, संजय अग्रवाल, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रकाश आदमने, बॅरि. वानखडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारोती कोल्हे प्रामुख्याने उपस्थित होते. शिबिराच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. संजय ठवळे, डॉ. प्रमोद वडते, डॉ. धनंजय देवते, डॉ. अलका थोडगे, सचिन काळे, शैलेश हातबुडे, सिद्धार्थ चनकापुरे, सविता लिहितकर, अनिता गणोरकर, डॉ. निवेदिता मानमोडे यांचेसह संजय गणोरकर, शुभम वाघ, चैतन्य सुपले, प्रदीप बगडे, अरविंद डहाट, प्रकाश कोकोडे, रजनी गणोरकर आदींनी सहकार्य केले. संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. लीलाधर खरपुरीये यांनी केले.

-: रा. से. यो स्थापना दिन :- 24/09/2023

नागपूर जिल्हा सकाळ नागपूर, सोमवार, २५ सप्टेंबर २०२३

## अवतीभवती




**मोहपा :** मार्गदर्शन करताना मान्यवर व उपस्थित अन्य.

# मोहपा येथे रासेयो स्थापना दिन कार्यक्रम

**मोहपा :** बॅरि. शेषराव वानखेडे जयंती आणि राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त बॅरि. वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे तर अतिथी म्हणून प्रा. डॉ. संजय ठवळे उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. कोल्हे यांनी बॅरि. वानखेडे यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. प्रमोद वडते यांनी केले. संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी केले. कार्यक्रमाला प्रामुख्याने डॉ. जाचक, डॉ. धनंजय देवते, डॉ. लिलाधर खरपुरीये, संजय गणोरकर, प्रा. चणकापुरे, प्रा. हातबुडे, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सचिन काळे, अजय अंजनकर, शुभम वाघ, चेतन सुपले आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद डहाट, रजनी गणोरकर, प्रदीप बगडे, प्रकाश कोकोडे यांनी प्रयत्न केले.

-: जलदिन :-

लोकमत
epaper.lokmat.com 3
नागपूर, रविवार, दि. २४ मार्च २०२४

इदूरकर यांना
र्चना रामटेके,

## मोहपा येथे जागतिक जल दिवस



**कळमेश्वर :** मोहपा येथील बॅरिस्टर शेषराव वानखेडे महाविद्यालय येथे जागतिक जल दिवस कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना व ग्रीन क्लबच्या संयुक्त वतीने करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. व्ही. कोल्हे, तर मुख्य अतिथी व प्रमुख वक्ते म्हणून प्रदीप विघ्ने, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. अलका थोडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदीप विघ्ने यांनी जागतिक जल दिवस विषयावर विचार व्यक्त केले. 'जल है तो, कल हैं' भविष्यात पाणीटंचाई हा प्रश्न गंभीर स्वरूप धारण करणार आहे. पावसाचे कमी प्रमाण, भूगर्भातील पाण्याची पातळी कमी होणे, पाण्याचा अपव्यय, वृक्ष-तोड, शहरीकरण, सिमेंटचे रस्ते, लोकसंख्या वाढ आदींमुळे पाण्यासाठी जागतिक संघर्ष अटळ असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ चे मानकरी प्रदीप नारायणराव विघ्ने यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डॉ. अलका थोडगे यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२४ प्राप्त झाल्यामुळे त्यांचाही सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रमोद वडते यांनी केले. संचालन डॉ. विनोद भालेराव यांनी केले तर आभार प्रा. सचिन काळे यांनी मानले. डॉ. लीलाधर खरपुरिये, डॉ. धनंजय देवते, प्रा. अनिता गणोरकर, प्रा. सिद्धार्थ चनकापुरे, प्रा. शैलेश हातगुडे, संजय गणोरकर, शुभम वाघ, चेतन सुपले, अजय आंजनकर, अरविंद डाहाट, प्रकाश कोकड्डु, रजनी गणोरकर आदींनी सहकार्य केले.

राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लब,
बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा व
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नागपूर
यांच्या संयुक्त विद्यमाने

नि:शुल्क

# कर्करोग निदान शिबिर

मंगळवार व बुधवार, दिनांक १२ व १३ सप्टेंबर २०२३
सकाळी १०.०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत

स्थळ- बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा
तह- कळमेश्वर, जिल्हा- नागपूर

## समारोप समारंभ

मंगळवार दि. २७/०२/२०२४ रोजी
सकाळी ११.३० वाजता

**अध्यक्ष**
मा. श्री सुनिलबाबू केदार
माजी मंत्री, म.रा.

**प्रमुख अतिथी**
डॉ. जगन्नाथ मोहंती
(सहयोगी प्राध्यापक इंस्टीटयुट ऑफ मॅनेजमेंट टेक्नालॉजी, नागपूर)

**प्रमुख अतिथी**
मा. सौ. मुक्ताताई कोकड्डे
(अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर)

**विशेष अतिथी**
मा. कु. कुंदाताई राऊत
(उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर)

**प्रमुख उपस्थिती**

मा. डॉ. बबनरावजी तायवाडे
(अध्यक्ष, श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था, नागपूर)

मा. श्री मनोहरजी कुंभारे
(माजी उपाध्यक्ष जिल्हा परिषद, नागपूर)

मा. श्री. बाबाराव कोढे
(अध्यक्ष, तालुका खरेदी विक्री संघ, कळमेश्वर)

मा. श्री. बाबाराव पाटील
(सभापती– कृषी उत्पन्न बाजार समिती, कळमेश्वर)

मा. प्रभाकरराव भोसले
(सभापती, पंचायत समिती, कळमेश्वर)

मा. श्रावणदादा भिंगारे
(उपसभापती, पंचायत समिती, कळमेश्वर)

मा. ॲड. शंतनु तायवाडे
(उपाध्यक्ष, श्री सच्चिदानंद शिक्षण संस्था, नागपूर)

श्री विजयराव भांगे
(सदस्य, पं.स. कळमेश्वर)

मा.डॉ. सोपानदेव पिसे
(संचालक, रा.से.यो., रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर)

मा.डॉ.सौ. शरयू तायवाडे
(प्राचार्य,तायवाडे कॉलेज महादुला, कोराडी)

मा.डॉ. आर.जी. टाले
(प्राचार्य, बॅरि. शेषराव वानखेडे महा. खापरखेडा)

डॉ. एम. व्हि. कोल्हे
(प्राचार्य, बॅरि. शेषराव वानखेडे महा. मोहपा)

**आयोजक**
डॉ. किशोर घोरमाडे । डॉ. राजेंद्र राऊत । डॉ. प्रमोद वडते



# निमंत्रण पत्रिका

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर

"स्वच्छ व स्वस्थ भारत आणि युवकांचा विकास""

**स्थळ**
श्रीक्षेत्र आदासा,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर.

**उद्घाटन**
शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी २०२४
स. १२:३० वाजता

*** आयोजक ***
तायवाडे कॉलेज महादुला, कोराडी
बॅरि.शेषराव वानखेडे महा. खापरखेडा
बॅरि.शेषराव वानखेडे महा.मोहपा